बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

वृत्तपत्रीय निवेदन

## भारतीय महिला ज्युनियर हॉकी संघातील खेळाडूंचा बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे सत्कार

**पुणे दिनांक 6 फेब्रुवारी २०२१ :** भारतीय महिला ज्युनियर हॉकी संघातील तीन होतकरू खेळाडूंचा व त्यांच्या प्रशिक्षकांचा बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव यांच्या हस्ते बँकेच्या मुख्य कार्यालयात सत्कार करण्यात आला. कुमारी वैष्णवी फाळके, कुमारी ऋतुजा पिसाळ व कुमारी अक्षता ढेकळे ह्या तिन्ही सत्कारार्थी खेळाडू सातारा जिल्ह्यातील फलटण ह्या गावच्या आहेत. सरव्यवस्थापक श्री व्ही. पी. श्रीवास्तव, श्री प्रशांत खटावकर, श्री उन्नाम आर. राव , श्री संजय रुद्रा, श्री आर. एस. बन्सल, व श्री अरुण कबाडे यांच्यासह प्रशिक्षक श्री अजित लाक्रा आणि हॉकी महाराष्ट्रचे सचिव श्री मनोज भोरे या सत्कार प्रसंगी उपस्थित होते.

‘ एवढ्या कमी वयात ह्या तरुण मुली देशाचे प्रतिनिधित्व करीत असल्याचा आम्हाला अभिमान व आनंद वाटतो. बँक ऑफ महाराष्ट्र होतकरू खेळाडूंना नेहमीच पाठबळ देत आली आहे. अशा सामान्य परिस्थितीतून वर आलेले खेळाडू हे अन्य खेळाडूंचे सुद्धा प्रेरणास्त्रोत ठरतात " असे उद्गार बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव यांनी याप्रसंगी काढले. क्रीडा क्षेत्रातील अशा तरुण प्रतिभा व गुणवत्तेला पाठबळ देण्यास बँक ऑफ महाराष्ट्र कटिबद्ध असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

ह्या मुलींनी चिली मधील सँनटियागो येथे जानेवारी २०२१ मध्ये झालेल्या स्पर्धेत भारताच्या महिला ज्युनियर हॉकी संघाचे प्रतिनिधित्व केले. ह्या स्पर्धेत भारतीय संघ पाच सामने जिंकून व एक अनिर्णीत राखून अजिंक्य राहिला. महाराष्ट्र राज्यातील मुलींनी प्रथमच अशी सर्वोत्तम कामगिरी साध्य करून दाखविली आहे. ह्या तरुण खेळाडूंनी त्यांचे खेळताना आलेले अनुभव कथन केले व आपला खेळ व शिक्षण यामध्ये कसा समतोल राखला हे सुद्धा सांगितले. बँक ऑफ महाराष्ट्राच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने सर्व उपस्थित

खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.